# समिती दर्पण

मे २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात आठ आणि नगरमध्ये दोन अशी दहा वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# व्यवस्था, सुरक्षितता, शिस्तीबाबत समाधान

ग्रामीण भागातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची सोय करतानाच त्यांच्या सर्वांगिण विकासाचा प्रयत्न विद्यार्थी साहाय्यक समितीत केला जातो. समितीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून हा प्रयत्न सफल होतो आहे का, हे पाहण्यासाठी वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून फीडबॅक घेतला जातो. यंदा दिलेल्या फीडबॅकमध्ये विद्यार्थ्यांनी राहण्याची व्यवस्था, वातावरण, सुरक्षितता, शिस्त, पर्यवेक्षकांचे लक्ष या बाबतीत समाधान व्यक्त केले आहे.

**अशोक पाथरकर**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा समितीतील व्यवस्था, सोयी, उपक्रम याविषयी विद्यार्थ्यांची मते व सूचना जाणून घेण्यासाठी फीडबॅक घेण्यात आला. समितीच्या १० वसतिगृहांतील ११२८ विद्यार्थी- विद्यार्थिनींनी ऑनलाइन पद्धतीने फीडबॅक दिला.

- **मुलभूत बाबी** - राहण्याची व्यवस्था, भोजन, वातावरण, सुरक्षितता, शिस्त, महत्त्वाच्या योजना- चार तास काम, पाल्य- पालक, कमवा- शिका, विद्यार्थी विकास केंद्र.
- **इतर कार्यक्रम व बाबी** - ग्रंथालय, अभ्यासिका, आर्थिक मदत, आरोग्य केंद्र, संगणक प्रशिक्षण व इंटरनेट सुविधा, योगासने, पसायदान, खेळ, भाषा वर्ग, पर्यवेक्षक संबंध.

या सर्व विषयांवरील विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली मते व आकडेवारी परिशिष्टांमध्ये दिली आहे.


- **सारांश** - विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या मतांचा विचार केल्यावर खालील निष्कर्ष निघतात,

१. राहण्याची व्यवस्था, वातावरण, सुरक्षितता, शिस्त, पर्यवेक्षकांचे लक्ष व संबंध या बाबतीत जवळजवळ ९० टक्के विद्यार्थी- विद्यार्थिनी अतिशय समाधानी आहेत.


२. भोजनाच्या बाबतीत समाधानाचे प्रमाण तुलनेत कमी आहे. पोळ्यांच्या बाबतीत सुधारणेला संधी असल्याचे बऱ्याच विद्यार्थ्यांचे मत आहे.

३. इतर उपक्रम व कार्यक्रमांच्या बाबतीत तक्रारी नाहीत. फक्त उपक्रमांची संख्या वाढवू नये, त्यामुळे अभ्यासाला, वैयक्तिक गोष्टींना वेळ मिळेल अशी विद्यार्थ्यांची भावना दिसते.

**फीडबॅक दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या**





**४. प्रवेश घेण्यापूर्वी समितीबद्दल माहिती कशी समजली?**




**५. राहण्याची व्यवस्था, वसतिगृहातील वातावरण, सुरक्षितता, शिस्त- उत्तम म्हणणाऱ्यांची संख्या-**


८५ टक्के



**६. चार तास काम योजना-**

योजनेचा फायदा आहे

९५ टक्के



योजनेचे लाभ- स्वयंशिस्त, वेळेचे नियोजन, श्रमप्रतिष्ठा शिकलो

योजनेत बदल करू नये, असे म्हणणारे विद्यार्थी- ९१ टक्के

**७. पाल्य- पालक योजना**

या योजनेविषयी सर्वांचे मत अनुकूल आहे.

१. **पालक चांगली वागणूक देतात, मार्गदर्शन करतात.**
२. **पालक परदेशात असूनही फोन, व्हॉट्सअपद्वारे संपर्कात राहतात.**
३. **काही विद्यार्थ्यांनी त्यांना कंपनी पालक म्हणून देण्यात आली आहे, असे म्हटले आहे. त्यातून मेंटॉरशीपचा हेतू साध्य होत असेल तर चांगले. अन्यथा यात बदल करावा.**

**८. विद्यार्थी विकास केंद्र-**

एकूण ११२८ पैकी ८९५ विद्यार्थ्यांनी (७९ टक्के) विविकेच्या कार्यक्रमांत भाग घेतला. त्यात जल्लोष क्रीडा महोत्सव, उन्मेष युवक महोत्सव, सिक्स सिग्मा या कार्यक्रमांचा मोठ्या संख्येने उल्लेख आहे. काही जणांनी उद्योजकता परिषदेचा उल्लेख केला आहे.

- **या कार्यक्रमांमुळे ज्ञान वाढले, संभाषण कौशल्य वाढले, आत्मविश्वास वाढला, जबाबदारीची जाणीव झाली, असे अनेकांनी म्हटले आहे.**
- **समितीमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांची संख्या जास्त आहे, असे वाटते का, या प्रश्नाला ५१ टक्के विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले आहे.**

**९. कमवा- शिका योजना**

ही योजना सर्वांनाच हवी आहे. यामुळे श्रमप्रतिष्ठेची जाणीव होते, कौशल्यवृद्धी होते, व्यक्तिमत्त्व विकास होतो, असे मत आहे. कशाबद्दलही कोणाचीही तक्रार नाही. फक्त एका विद्यार्थिनीने अहिल्यानगरमध्ये ही योजना सुरळीत नाही, असे म्हटले आहे.

**१०. जेवण**

- **सकाळचे दूध आणि दोन वेळचे जेवण, यातून पुरेशी ऊर्जा मिळते का, या प्रश्नाला ७८ टक्के मुलांनी होय असे उत्तर दिले आहे.**



**जेवणाबद्दल तक्रारी व सूचना-**

- **चपात्या जाड व कच्च्या असतात, असे अनेक विद्यार्थ्यांचे मत आहे.**
- **काही वेळा जेवण पुरेसे नसते, असे काहींचे मत आहे.**

**काही सूचना-**

- **सकाळी कॉलेज असणाऱ्यांसाठी काही तरी सोय करावी.**
- **रविवारी गोड पदार्थ असावा.**
- **कोबी, पालकऐवजी पिठले, आमटी किंवा कढी ठेवावी.**
- **बुधवारची खिचडी व शनिवारचा मसालेभात खूप आवडतो.**


**११. इतर उपक्रम**

समाधान असलेले उपक्रम- ग्रंथालयातून मिळणारी क्रमिक व अवांतर पुस्तके, अभ्यासिका, संगणक प्रशिक्षण/ लॅपटॉप, आरोग्यकेंद्र, योगासने, पसायदान, दर्पण, विद्यार्थी व्यवस्थापन, इंटरनेटची चांगली उपलब्धता असावी.

**१२. आर्थिक मदत**

- **आर्थिक मदतीबाबत असमाधान व्यक्त करणाऱ्या मुलांचे प्रमाण १६ टक्के आहे.**
- **समितीने प्रत्येक तालुक्यातील माजी विद्यार्थी किंवा माजी कार्यकर्ता यांच्या माध्यमातून प्रवेशित विद्यार्थ्यांची गृहभेट करावी. बरेचसे विद्यार्थी कागदपत्रे खोटी देऊ शकतात. किंवा त्यांची आर्थिक स्थिती थोडी बरी असू शकते, असे मत काही विद्यार्थ्यांनी नोंदले आहे.**
- **समितीतील काही विद्यार्थ्यांकडे महागडे फोन किंवा दुचाकी असण्याची शक्यता एका विद्यार्थ्याने नोंदली आहे.**
- **११२८ पैकी ३३५ मुलांना समितीतून किंवा बाहेरून किंवा दोन्हीकडून आर्थिक मदत मिळाली.**

३३५ मुलांना दोन्हीकडून आर्थिक मदत



**१३. समितीतून बाहेर पडल्यावर तुम्हाला समितीसाठी काय करायला आवडेल?**

या प्रश्नाला बहुतेक सर्वांनी आर्थिक मदत करू, कार्यकर्ता म्हणून काम करू, पाल्य- पालक योजनेत सहभागी होऊ, विद्यार्थ्यांशी संवाद ठेवू, त्यांना आर्थिक मदत करू, अशी उत्तरे दिली आहेत.

**१४. विद्यार्थिनींकडून आलेली एक सूचना -**

काही मुली मानसिक तणावाखाली असतात. त्यांच्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या भेटी ठेवाव्यात.

# विद्यार्थ्यांना उमगले वाचनाचे महत्त्व

## दोन दिवसीय कार्यशाळेत वाचन, अभिवाचन आणि विचारमंथन

विद्यार्थ्यांमध्ये वाचन, अभिवाचन, लेखन आणि विचारमंथनाची आवड निर्माण व्हावी, तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक कौशल्ये विकसित व्हावी, या उद्देशाने समितीच्या लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात १४ व १५ मे रोजी वाचन कार्यशाळा आयोजित केली होती. .

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. सुप्रिया केळवकर यांनी 'वाचू आनंदे' या विषयावर बोलताना मोठ्याने वाचन केल्याने उच्चार सुधारतात, भाषेची जाण विकसित होते तसेच स्वतःच्या चुका लक्षात येतात, असे सांगितले.

'काय वाचावे' याविषयी उल्का पासलकर यांनी मार्गदर्शन केले.

### प्रतापराव पवार यांनी दिला सतत शिकत राहण्याचा संदेश

कार्यशाळेमध्ये समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी शालेय जीवनातील आठवणी सांगत विद्यार्थ्यांना सतत शिकत राहण्याचा संदेश दिला. वयाच्या ८० वर्षांनंतरही नवीन विषय वाचण्याची आणि शिकण्याची त्यांची आवड विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या विषयांवरील पुस्तकांचा उल्लेख करीत बदलत्या काळानुसार अद्ययावत राहण्याचे महत्त्व सांगितले. विविध संस्था, तंत्रज्ञान आणि विचारप्रवाह यांनी एकत्रितपणे कार्य केल्यास समाजाच्या विकासाला गती मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष वाचनाचे सत्र आयोजित केले होते. विद्यार्थ्यांनी वाचन करून त्यावर आपले विचार मांडले. पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात अनिता देशपांडे आणि सुनीता पाटील यांनी अभिवाचनाची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांचे गट तयार करून त्यांना संहिता देण्यात आली. त्याचे सादरीकरण दुसऱ्या दिवशी झाले.



दुसऱ्या दिवशी 'वाचन प्रेरणा आणि वाचन कसे वाढवावे' या विषयावर वासंती नाटेकर, कविता हेबाळकर आणि सुनीता पाटील यांनी मार्गदर्शन केले. यानंतर अभिवाचन सत्र पार पडले. अनिता कहाते यांनी विद्यार्थ्यांसोबत संवादात्मक सत्र घेतले. शेवटच्या सत्रात अतुल कहाते यांनी 'वाचनातून लेखक कसा घडतो' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यशाळेचे नियोजन आणि व्यवस्थापन वल्लभ कोल्हटकर, सुप्रिया केळवकर तसेच समितीच्या कार्यकर्त्यांनी केले.

तयाचा वेलू...


# जगण्याला दिशा देणारे विद्यापीठ

सध्या पुण्यात एम.आय.टी.मध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेश्वर प्रकाश जाधवर हे समितीत २००७ ते २०१० या काळात वास्तव्यास असले तरी आजही समितीचा भाग आहेत. त्यांनी मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज् या विषयात एम.एस्सी आणि नंतर पीएच.डी. केले आहे. याशिवाय त्यांनी एम.ए. (इंग्लिश), सी.जे., सी.सी. सी.ए. या पदव्या संपादन केल्या आहेत. तसेच ते सेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. या सगळ्या पदव्यांमागे उभा आहे तो म्हणजे समितीचा आधार, असे ते अभिमानाने आणि कृतज्ञतापूर्वक नमूद करतात.

श्री. जाधवर जून २००७ मध्ये पुणे विद्यापीठात एम.ए. करण्यासाठी आले. खिशात स्वप्ने होती, पण डोक्यावर छप्पर नव्हते. गावातील दहावीचे शिक्षक मुंडे सरांनी त्यांना समितीबद्दल सांगितले होते. शोधत शोधत आपटे वसतिगृह गाठले. तेव्हा कला शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश फारसा दिला जात नव्हता. त्यांच्याकडे होती फक्त एक फाईल— सांस्कृतिक कार्यक्रम, कथाकथन, बक्षिसांची प्रमाणपत्रे असलेली. दोनशेपेक्षा जास्त शाळांवर कथाकथनाचे कार्यक्रम त्यांनी केलेले होते. ती फाईल पाहून त्यांना अर्ज दिला गेला.

मुलाखतीत त्यांना एक प्रश्न विचारला, "बार्शी किंवा सोलापूरला एम.ए. करता येते, मग पुण्यात का आलास?" तेव्हा त्यांनी पुन्हा तीच फाईल पुढे केली. म्हणाले, "सर, पदवीचे शिक्षण मी गावोगावी कथाकथन करून पूर्ण केले. पुण्यात कला, साहित्य आणि सांस्कृतिक वातावरण आहे. मला या क्षेत्रात करिअर करायचेय." अखेर चौथा पार्टनर म्हणून आपटे वसतिगृहात त्यांना प्रवेश मिळाला. काम मिळाले, मेसमध्ये चार तास. एक वर्ष मेसमध्ये काम केले. मग विद्यार्थी विकास केंद्राचे काम मिळाले आणि तिथून संधींचे एकेक दार उघडत गेले.

जाधवर म्हणतात, समितीमुळे मी उच्च शिक्षण घेऊ शकलो, हे खरे. पण त्याहून मोठे म्हणजे समितीने मला घडवले. रोजचा योगा, श्रमदान, गटचर्चा, सांस्कृतिक स्पर्धा, विद्यार्थी विकास केंद्राचे


ज्ञानेश्वर जाधवर

उपक्रम यांतून माझे व्यक्तिमत्व आकाराला आलं. जगण्याची मूल्ये नकळत माझ्यात रुजली.

कथाकथन आणि वक्तृत्व स्पर्धेत समितीत विजेता झालो. त्याने आत्मविश्वास दिला. मग बाहेरच्या जगातही पाय रोवून उभा राहता आले.

## लेखणीचा प्रवास

माणसांच्या जगण्याचा तळ शोधणे, त्यांच्या चित्रविचित्र अनुभवांना गोष्टीचे रूप देणे, हे जाधवर यांना आवडते. याच वेडातून 'यसन', 'लॉकडाऊन', 'कूस', 'आशेच्या गुंगीत लटकलेलं तारुण्य', 'चंबुगबाळ' आणि शून्यरेषा या त्यांच्या लोकप्रिय कादंबऱ्या जन्माला आल्या. 'बरं झालं बापानं शाळेत घातलं', 'पोरा तुला आईच्या रक्ताची शपथ', 'लॉकिट' या कथा लिहिल्या. 'द लॉस्ट बेट', 'ध्यास', 'चला आता चला लग्नाला चला' या एकांकिका लिहिल्या. संशोधन क्षेत्रात त्यांचे पाच शोधनिबंध प्रकाशित झाले, तर नऊ शोधनिबंध त्यांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर केले. दूरदर्शनच्या ‘कृषिदर्शन’, ‘आमची माती आमची माणसं’, ‘काही खास काही विशेष’ या कार्यक्रमांसाठी दोनशेहून अधिक तज्ज्ञांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, पुढारी, अक्षरनामा आणि इतर मासिकांसाठी ३६ हून अधिक लेख लिहिले.

## सन्मान आणि पुरस्कार

या प्रवासात अनेकांनी श्री. जाधवर यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा युवा साहित्य गौरव पुरस्कार २०२३-२४, झी युवा साहित्य सन्मान २०२३, साहित्य अकादमी युवा पुरस्कारासाठी 'यसन' कादंबरीचे नामांकन २०२१, महाराष्ट्र शासनाचा यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्‌मय पुरस्कार— श्री.ना. पेंडसे पुरस्कार २०२०, यशवंतराव चव्हाण सेंटरचा युवा साहित्य पुरस्कार २०२१, आपटे वाचन मंदिर, इचलकरंजीचा उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार, असे अनेक राज्यस्तरीय पुरस्कार 'यसन', 'लॉकडाऊन', 'कूस' या कादंबऱ्यांना मिळाले.

आज मागे वळून पाहताना श्री. जाधवर म्हणतात, "आज मी जिथे आहे, तिथपर्यंतचा रस्ता समितीच्या आपटे वसतिगृहाच्या पायरीपासून सुरू झाला. चार तास मेसमध्ये ताटे उचलणाऱ्या मुलाला समितीने लेखणी उचलायला शिकविले. ‘पुण्यात का आलास?’ या प्रश्नाचं उत्तर मी माझ्या पुस्तकांतून, कथांतून आणि वर्गात उभे राहून देतोय. समिती म्हणजे माझ्यासाठी फक्त वसतिगृह नाही तर ती माझी शाळा आहे, माझे विद्यापीठ आहे. तिने मला फक्त पदवी दिली नाही, तर जगण्याची दिशा दिली."

# कलेच्या विद्यार्थ्यांसाठी अभिव्यक्तीचे दालन

## समितीत आर्ट गॅलरीचे उद्‌घाटन, कलाकार माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयक आवड निर्माण करण्यासाठी आणि कलेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समितीच्या लजपत संकुलात कलादालन (आर्ट गॅलरी) उघडण्यात आले आहे. या कलादालनाचे उद्‌घाटन १६ मे रोजी ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांच्या हस्ते आले. यानिमित्ताने कलाकार माजी विद्यार्थ्यांचा मेळावाही आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला ज्येष्ठ चित्रकार मिलिंद मुळीक, समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, चित्रकार अश्विनी पवार, हेमंत राजहंस, प्रज्ञा सातारकर, प्रभाकर पाटील, हनुमंत जगनगडा, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, सचिव मनीषा गोसावी आदी उपस्थित होते. यावेळी भरविण्यात आलेल्या कलाविषयक शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन दिवस सुरू राहिलेल्या या प्रदर्शनात चित्रकार विलास कुलकर्णी यांची जलरंगातील प्रात्यक्षिकांचा आनंद कलाप्रेमींना घेता आला.



“कला हे केवळ सौंदर्य अनुभवण्याचे साधन नसून, भारतीय संस्कृतीची ओळख जपणारी प्रभावी अभिव्यक्ती आहे. ती समाजाला संवेदनशील बनविते आणि पुढील पिढीपर्यंत संस्कार आणि परंपरा पोचविते. कल्पकता, संयम, एकाग्रता, समर्पण भाव तुमच्यातील कलाकार अधिक समृद्ध करतो.

- **विवेक खटावकर,**
ज्येष्ठ शिल्पकार

“कला ही केवळ छंद नसून ती विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर होण्याची ताकद देते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याचा विकास करण्याबरोबरच भविष्यात करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

- **मिलिंद मुळीक,**
ज्येष्ठ चित्रकार

“समितीने शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कला, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी कायमच पुढाकार घेतला आहे. सकारात्मक आणि संवेदनशील पिढी घडविण्यासाठी अशा सांस्कृतिक आणि कलात्मक उपक्रमांची आवश्यकता आहे.

- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष,
विद्यार्थी साहाय्यक समिती

# अ‍ॅडव्हान्स रोबोटिक्स कार्यशाळेचे आयोजन

विद्यार्थी साहाय्यक समिती, सिमु सॉफ्ट आणि आशीर्वाद ग्रोथ फाऊंडेशन यांच्या वतीने अ‍ॅडव्हान्स रोबोटिक्स कार्यशाळेचे ८ व ९ मे रोजी आयोजन करण्यात आले होते.

कमवा व शिका योजनेतील सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत ८ व ९ मे रोजी समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे मुलींच्या वसतिगृहात ही कार्यशाळा झाली. सोहम अ‍ॅकॅडमीमार्फत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पुण्यातील मराठी शाळांमध्ये रोबोटिक्सचे वर्ग घेतले, त्यातील निवडक विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा झाली.

कार्यशाळेत रोबोटिक्स, आयओटी, ड्रोन असेंब्ली, टिंकरकॅड आणि आटोकॅड यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. समितीचे माजी विद्यार्थी सुनील चोरे यांनी त्यांच्या सिमु सॉफ्टतर्फे या कार्यशाळेचे विनामूल्य आयोजन केले होते. कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन सर्व सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली.



# माजी विद्यार्थी मंडळातर्फे रक्तदान व नेत्र शिबिर

समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाच्या पुढाकारातून (कै.) रमाकांत तांबोळी सर यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त लजपतराय भवन येथे ३ मे रोजी रक्तदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत, सलग तिसऱ्या वर्षी आयोजित केलेल्या या उपक्रमाला माजी विद्यार्थी, समितीचे कार्यकर्ते व कर्मचारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रक्तदान शिबिरात ३७ जणांनी रक्तदान केले. ८० जणांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. शिबिरांचे उद्‌घाटन माजी विद्यार्थी डॉ. दशरथ नेवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे उपस्थित होते. श्री. रंजनकर यांनी दिवंगत तांबोळी सरांच्या कार्याचा गौरव करीत, मंडळाचे कार्य त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार सुरू असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे डॉ. दशरथ नेवसे यांनी समितीबद्दल कृतज्ञता व्यक्त व्यक्त केली. प्रास्ताविक सुनील चोरे यांनी केले. सूत्रसंचालन मंडळाच्या सचिव सौ. मनीषा गोसावी यांनी केले. खजिनदार अ‍ॅड. देविदास टिळे यांनी पूना हॉस्पिटल ब्लड बँक, डॉ. दूधभाते नेत्रालय तसेच रक्तदाते व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.



# उपक्रमांसाठी योगदान देणाऱ्या मार्गदर्शकांप्रती कृतज्ञता

## करिअरसाठी दिशा मिळाल्याची विद्यार्थ्यांची भावना



विद्यार्थी विकास केंद्राच्या विविध उपक्रमांमध्ये योगदान देणाऱ्या मार्गदर्शकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांना समितीच्या प्रकल्पांबद्दल माहिती देण्यासाठी २३ मे रोजी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध प्रशिक्षण उपक्रमांचा आढावा यावेळी घेण्यात आला. विद्यार्थ्यांना वर्षभर सॉफ्ट स्किल्स, तांत्रिक कौशल्ये, मॉक इंटरव्ह्यू, संवाद कौशल्य विकास तसेच उद्योग क्षेत्रातील संधी व अपेक्षा याबाबत सखोल मार्गदर्शन देण्यात आले. यासाठी हर्षल मोर्डे, भूषण वाणी, शलाका भालेराव, राजीव राजपूत, आशिष यार्दी, महेश्वरी देसाई, मंदार मोडक, विजय गायतोंडे, डॉ. कल्पना देशपांडे, डॉ. विलिंद घारपुरे, डॉ. अरुणा ठुबे, नंदिनी कुलकर्णी, प्रिया कोटस्थाने- बर्वे, अद्वय राजहंस, सीमा सिंग, महेंद्र माळी या तज्ज्ञ व जाणकारांनी योगदान दिले. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन सत्रांचा वैयक्तिक आयुष्यात लाभ झाल्याचे सांगितले. या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वासात वाढ झाली, मॉक इंटरव्ह्यूमुळे मुलाखतीची भीती कमी झाली, उद्योग क्षेत्रातील अपेक्षा लक्षात आल्या, करिअरबाबत स्पष्ट दिशा मिळाली, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. अनेक विद्यार्थ्यांनी मिळालेल्या एटर्नशिप व प्लेसमेंट संधींबद्दल आनंद व्यक्त केला.

यावेळी समितीच्या कार्याचा आढावा कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी सादर केला. प्रशिक्षण उपक्रमांची माहिती पद्मा शहाणे यांनी दिली. सूत्रसंचालन सीमा होस्कुटे यांनी केले. या उपक्रमांसाठी डॉ. मकरंद फडके, डॉ. ज्योती गोगटे यांनी पुढाकार घेतला होता.